ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# कृषी क्षेत्राचा आर्थिक अभ्यास

**स्मिता भिवा रणदिवे**
*संशोधक विद्यार्थी*

*Corresponding Author: स्मिता भिवा रणदिवे*

DOI - 10.5281/zenodo.14875329

**घोषवारा:**

*Agriculture Sector 'कृषी क्षेत्र' या शोधनिबंधात भारतातील महत्वपूर्ण कृषी क्षेत्राचा अब्यास करण्यात आलेला आहे. भारतासारख्या विकसनशील आणि कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये कृषी व्यवसायाला प्राधान्यक्रम देणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखात कृषी क्षेत्राचे महत्व भारतीय अर्थव्यवस्था राष्ट्रीय उत्पन्नातील कृषिक्षेत्राचा हिस्सा रोजगार निर्मितीत्तील योगदान परकीय व्यवहारातील योगदान व कृषी क्षेत्राचा अभ्यास करण्यात आला आहे.*

**प्रस्तावना:**

भारतातील अर्थव्यवस्था कृषी प्रधान असल्याने भारताच्या औद्योगिक आर्थिक विकासाचे प्रमुख स्त्रोत शेती हाच आहे. भारत खेड्यांचा देश असल्याने कृषी व्यवसाय ग्रामीण व्यवसाय असल्याने प्रक्रिया उद्योग सुद्धा ग्रामीण उद्योग आहे. तसेच भारताला कृषीप्रधान राष्ट्र म्हणून आजही ओळखले जाते. भारतातील एकूण निर्यातींपैकी 17 टक्के निर्यात शेती क्षेत्रातून केले जाते. शेती क्षेत्राकडून साखर उद्योग, ताग उद्योग अशा अनेक उद्योगांना शेती क्षेत्रातून मदत केली जाते. आज राष्ट्रीय उत्पन्नातील 24% उत्पन्न हे शेती व्यवसायातून प्राप्त होते. लोकपजीविकासाठी विविध प्रकारच्या व्यवसायामध्ये गुंतलेले असतात. त्यानुसार अर्थव्यवस्थेचे तीन प्रमुख क्षेत्रामध्ये विभाजन केले जाते.

१. प्राथमिक क्षेत्र २. द्वितीयक क्षेत्र
३. तृतीयक क्षेत्र

**उद्दिष्टे:**

१. कृषी क्षेत्राचा अर्थ समजून घेणे.
२. कृषी क्षेत्रातील विविध घटकांचा अभ्यास करणे.
३. कृषी क्षेत्रातील वास्तव परीस्तीठीचा अभ्यास करणे.
४. कृषी क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

**भारतीय शेतीची पद्धत:**

भारतात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारताचा कृषी उत्पादनात दुसरा क्रमांक आहे. देशातील सर्वात मोठा उद्योग आणि देशाचा सामाजिक आर्थिक विकासात शेती महत्त्वाची भूमिका बजावते. गहू, तांदूळ, कापूस रेशीम, भुईमुग आणि इतर दर्जेदार उत्पादन करणारा जगातील भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

**हवामानाचा प्रभाव:**

भारतामध्ये ठिकाणानुसार विशिष्ठ माती आणि विशिष्ठ हवामान असल्याने ते विशिष्ठ प्रकारच्या शेतीसाठी योग्य आहे. देशाच्या पश्चिम भागामध्ये ५० से. मी. पेक्षा कमी पाऊस पडत असल्याने शेती व्यवस्था हि पिकाची लागवड करण्यास प्रतिबंधित असते ओ दुष्काळग्रस्त असते. उदा. गुजरात, राजस्थान, दक्षिण पंजाब आणि उत्तर महाराष्ट्राचे असे

वातावरण असल्यामुळे शेतकरी ज्वारी, बाजरी, आणि वाटण्या सारखे उत्पादन घेतो.

उत्तर भारताच्या पुर्वेकडे १००-२०० से. मी. पावसाचे सिंचन होते. या प्रदेशात पिकामध्ये दुप्पट वाढ करण्याची क्षमता आहे. उदा पश्चिम बंगाल, बिहारचा काही भाग, उत्तर प्रदेश आणि आसाम ह्या भागामध्ये असे वातावरण आहे. त्यामुळे येथील शेतकरी तांदूळ, ऊस, ताग अशी पिके घेतात.

भारताचा विचार केला तर पिकांचे तीन प्रकार केले जातात. व ही पिके हंगामानुसार घेतले जातात. खरीप पिके पावसाळ्याच्या सुरुवातीपासून ते हिवाळ्याच्या सुरुवातीपर्यंत जुन ते नोव्हेंबर पर्यंत घेतले जातात. उदा. तांदूळ, मका, बाजरी, भुईमुग, मुग उडीद ही पिके.

**सिंचन शेती:**

शेतीमध्ये लागवड करत असताना नद्या, जलाशाये, टाक्या, आणि विहिरी यांचा वापर होतो. लोकसंख्या वाढीबरोबर अक्षाची मागणी वाढते. व त्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. पुढील वर्षामध्ये शेती उत्पादन वाढवायचे असल्यास आवश्यक भूमिका पार पडणे आवश्यक आहे. सन १९५० मध्ये सिंचनातील शेतीचे क्षेत्र २२.६ दशलक्ष हेक्टर वरून १९९० मध्ये ५९ दशलक्ष हेक्टर झाले. १९५१ आणि १९९० च्या दरम्यान सुमारे १३५० मोठ्या आणि मध्यम आकाराचे सिंचनकार्य सुरु झाले. आणि त्यापैकी सुमारे ८५० पूर्ण झाले. निधी आणि तांत्रिक कौशल्य यांचा कमी पुरवठा असल्यामुळे इंदिरा गांधी कालवा प्रकल्पासह अनेक प्रकल्प मंद गतीने पुढे गेले १९८० ते १९९० च्या दशकाच्या सुरुवातीस पंजाब, हरियाना आणि राजस्थान या राज्यातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर हस्तांतर केले. सिंचनाची समस्या कमी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्तोत्रांची भूजल पातळी सुद्धा कमी आहे.

सिंचानाबरोबर पिकात बदल करणे हा उपजीविकेचा एक प्रकार आहे. मातीची पोत क्षमता की जी कीटक व तन यामुळे उत्पादन क्षमता कमी करते.

**व्यावसायिक शेती:**

मोठ्या प्रमाणवर लागवड करून व्यावसायिक पिके घेतली जातात. जास्त पैसे मिळ्याण्स्ठी ती पिके घेतली जातात. गुजरात, तामिळनाडू, पंजाब, हरियाना आणि महाराष्ट्रासारख्या कमी लोकसंख्या असलेल्या भागात हे सामान्य आहे. गहू, कापूस, ऊस आणि मका ही व्यावसायिक पिकांची काही उदाहरणे आहेत.

**वैरणशेती:**

भारतातील कोरड्या प्रदेशमध्ये लोकसंख्या व प्राण्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ आल्याने धान्य, चार आणि इंधन, कापडाची मागणी वाढत आहे.. काही भागात पाऊस १००-४०० मी.मी. असल्याने शेतजमिनीमध्ये आवश्यक खनिजे पोषक तत्वांची कमी उपलब्धता असल्याने शेती उत्पादन कमी आहे. शेतीमध्ये जैविक तंत्रज्ञानाचा उपयोग करून कोरडवाहू शेतीचे उत्पादन स्तर बाढवून ही मामणी पूर्ण करता येते. व शेतीची जैविक प्रक्रिया सुधारते. भारतातील कोरडवाहू शेतीमध्ये वैरणशेती करून जमिनीचा कस पुन्हा भरून काढण्यासाठी जंगलातील शेतीचा उपयोग केला जातो.

**भारतातील कृषी क्षेत्र:**

प्राचीन काळापासून शेती ही भारतातील लोकांची जीवनपद्धती आहे. आजही भारतातील लोकांसाठी शेती हेच उपजीविकेचे सर्वात मोठे साधन आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने राबवलेले कृषी विकासाचे धोरण प्रामुख्याने अन्न उत्पादनात स्वयंपूर्णतः आणि स्वावलंबनाच्या दृष्टीने आखण्यात आले. आता शेती विकासात प्रगती होऊन मोठे संरचनात्मक बदल झालेत. मात्र आज

उत्पादकता कमी, भांडवल निर्मितीचा दर कमी, मान्सून वर आधारलेली शेती, सिंचनाचे कमी प्रमाण, कमी यांत्रिकीकरण, कृषी वित्त असे प्रश्न शेती समोर आहेत.

| अ. नं. | स्थूल देशांतर्गत उत्पादन (ट्रीलीयन डॉलर मध्ये) | वर्ष २०२२ | वर्ष २०२३ |
|---|---|---|---|
| १ | अमेरिका | २५.५ | २७.९ |
| २ | चीन | १७.९ | १७.७ |
| ३ | जपान | ४.२ | ४.४ |
| ४ | जर्मनी | ४.१ | ४.२ |
| ५ | भारत | ३.४ | ३.७ |

(स्त्रोत - vision India-2047: transforming the nation future)

**भारतीय अर्थ्यव्यस्थेतील कृषी क्षेत्रीचे महत्त्व व भूमिका:**

भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात कृषिप्रधान असून उद्योग व सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कृषिप्रधान असुन उद्योग व सेवा क्षेत्रात मोठा विकास असला तरी कृषिक्षेत्र त्यांच्या विकासासाठी एक मर्यादक घटक म्हणून कार्य करताना दिसते. थोडक्यात कृषिक्षेत्र अविकीसित राहल्याने उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासावर आपोआपच मर्यादा येते.

**राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा:**

स्वातंत्र प्राप्तीचा वेळी कृषी आणि सलंग्र क्षेत्राचा GDP हिस्सा ५०% पेक्षा जास्त होता. त्यानंतर तो घसरला. तो पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**( कृषी क्षेत्राचा हिस्सा % मध्ये )**

| कृषी आणि सलंग्न क्षेत्रे पैकी | २०१७-१८ १८.३ | २०१८-१९ १७.६ | २०१९-२० १८.४ |
|---|---|---|---|
| पिके | १०.५ | ९.७ | १०.७ |
| पशुधन | ५.१ | ५.१ | ५.२ |
| वनिकी | १.४ | १.५ | १.३ |
| मत्सव्यवसाय | १.२ | १.२ | १.२ |

वरील घडता हिस्सा अर्थव्यवस्थेतील सकारात्मक, संरचात्मक बदल दाखवतो. विकसीत औद्योगिक देशात राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ३.४% पेक्षा कमी असतो मात्र त्यावेळी तांत्रिक प्रगतीमुळे हे देश जनतेच्या अन्नधान्याची गरज निर्यात वाढवून अतिरिक्त उत्पादन करू शकतात.

**रोजगार निर्मितीतील योगदान:**

एकूण लोकसंख्या जास्त असल्याने कृषी क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेच्या आधार रोजगाराचा प्रमुख स्रोत कृषीक्षेत्रावरच रोजगारासाठी लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या अवलंबून राहते. साहजिकच उद्योग व सेवा क्षेत्राच्या बाबतीत हे अवलंबित व कमी राहते.

| जनगणना | कृषी कामगार ( दशलक्ष ) | टक्केवारी |
|---|---|---|
| १९५१ | ९७.२ | ६९.७ |
| १९६१ | १३१.१ | ६९.५ |
| १९७१ | १२५.७ | ६९.७ |
| १९८१ | १४८.० | ६०.५ |
| १९९१ | १८५.३ | ५९.० |
| २००१ | १३४.१ | ५८.२ |
| २०११ | २६३.१ | ५४.६ |

**परकीय व्यापारात योगदान:**

भारताच्या परकीय व्यापारात कृषी व्यापारात कृषी क्षेत्राचा हिस्सा मोठा आहे पूर्वीपासूनच भारत चहा, कॉफी, साखर, तंबाखू, कोको, सुती कपडे, ज्यूट, कच्ची लोकर, वनस्पती तेल इत्यादी पारंपारिक वस्तूंची निर्यात करत आहे. १९९०-९१ पासून एकूण आयातीत कृषी व संलग्र वस्तूंच्या आयातीत २ रस ६% प्रमाण दरम्यान बदलत आहे. व निर्यातीचे प्रमाण १० रस २० % दरम्यान बदलताना दिसते. गेली काही वर्षात भारताच्या एकूण आयात व निर्यातीतील हिस्सा पुढीलप्रमाणे

| **वर्ष** | **एकूण आयातीतील हिस्सा %** | **एकूण निर्यातीतील हिस्सा %** |
|---|---|---|
| १९९०-९१ | २.७९ | १८.४९ |
| २०००-०१ | ५.२९ | १४.२३ |
| २०१०-११ | ३.०३ | ९.१४ |
| २०११-१२ | २.९९ | १२.४७ |
| २०१२-१३ | ३.५९ | १३.९० |
| २०१३-१४ | ३.१६ | १३.७९ |
| २०१४-१५ | ४.४३ | १२.६४ |
| २०१५-१६ | ५.६३ | १२.५५ |
| २०१६-१७ | ६.३९ | १२.२६ |
| २०१७-१८ | ५.०७ | १२.२६ |
| २०१८-१९ | ३.८१ | ११.९० |
| २०१९-२० ( P ) | ४.३९ | ११.४० |
| | निर्यातीतील हिस्सा | आयातीतील हिस्सा |
| २००० | १.१% | ०.७% |
| २००५ | १.२% | ०.८% |
| २०१० | १.७% | १.३% |
| २०२० | २.२% | १.४% |

**रोजगार :** भारतातील ग्रामीण भागातील बहुतांश जनता ही शेतीवर अवलंबून असल्याने रोजगाराची संधी प्राप्त होते.

**अर्थव्यवस्था:** भारताच्या अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठा वाटा म्हणजेच कृषी क्षेत्र होय. कृषी क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेला बराच हातभार आहे.

**अन्नसुरक्षा:** भारतातील लोकांसाठी नुसते व्यावसायासाठी नसून तर दैनिक अन्नधान्य व भाजीपला पुरवण्याचे काम हे क्षेत्र करते.

**कृषी क्षेत्राचा विकास:**

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या काळामध्ये देशातील शेतीची स्थिती दयनिय होती. भारतीय शेती पारंपारिक व निर्वाहक प्रकारची होती. यामध्ये प्रथम खाद्य पिकांना महत्त्व होते. देशाच्या फाळणी च्या काळात भारतातील गावाखालील ३० टक्के, भाताखालील २८ टक्के ज्युट खालील ७६.६ टक्के तर कापशिखालील २६.६ टक्के क्षेत्र हे पाकिस्तानच्या भागात गेल्याने या पिकांचा प्रश्न निर्माण झाला होता.

कृषी समस्यांमुळे पुढील बाबी समाविष्ट होतात. कर्जबाजारीकरन, छोटे व विखुरलेले धारण क्षेत्र, मान्सूनवर आधारलेली व पारंपारिक शेती जमीन व कामगारांची कमी उत्पदाकात अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नसणे इ.

नियोजनाच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकास साध्य करण्याचे धोरण कि ज्यासाठी नियोजन आयोगाने ठेवलेली पुढील उद्दिष्टे -

१. कृषी उत्पादन व उद्याकतेत वाढ त्यासाठी अधिक भूमी लागवडीखाली आणणे व आदानाची तीव्रता वाढवून उपादन व उद्यादकता बाढणे.
२. रोजगाराच्या संधी मध्ये बाढ कृषीक्षेत्रात रोजगाराच्या अधिक संधी वाढवून ग्रामीण गरिबांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे.
३. जमिनीवरील लोकसंख्येचा दबाव कमी करणे त्यासाठी कुळाचे शोषण नष्ट करणे, अतिरिक्त जमीन भूमिहीन शेतकऱ्यांमध्ये वाटणे आणि याद्वारे ग्रामीण भागात शक्य तेवढी समानता व न्याय प्रस्थापित करणे थोडक्यात सर्वच पंच वार्षिक योजनांमध्ये जरी हि उद्दिष्टे ठेवली असी तरी प्रत्यक्षात कृषी नियोजनाचा भर कृषी उत्पादन वाढीवरच होता, इतर उद्दिष्टांना कमी महत्त्व होते.

**कृषी क्षेत्रातील उत्पादन वाढवण्यासाठी उपाय योजना:**

१. आधुनिक तंत्रज्ञान व यंत्रांचा वापर कृषी क्षेत्रात उत्पादन वाढवण्यासाठी यंत्रांचा व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे शेतकर्यांना कमी श्रम व उत्पादनास वाढ होण्यास मदद मिळते.
२. जमिनीची योग्यता - जमिनीमध्ये सुधारणा करून व तिची योग्य रित्या मशागत करून ती सुपीक बनवल्यास उत्पादनाच्या वाढीस मदद होते.
३. पाण्याची सुविधा - आधुनिक यंत्रांद्वारे तसेच योग्य स्त्रोतांच्या आधारे पाणी पुरवठा केल्याने उत्पादनात वाढ होते.
४. प्रगत बी बियाणे यांचा वापर चांगल्या प्रतिच्या बी बियाणांच्या वापराने बदल दिसून येतो.
५. शेतीविषयक संशोधन संशोधनाचे उद्घादन वाढीला अत्यंत महत्त्व आहे. याद्वारे आधुनिक लागवड पद्धती, उपाय त्यांचा वापर करून उद्यानात वाढ करू शकतो.

**निष्कर्ष:**

१. भारताच्या विकासाच्या दृष्टीकोनातून कृषी क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहे.
२. कृषी क्षेत्राचा विकास करण्यासाठी उपलब्ध साधनांचा वापर पर्याप्त होणे गरजेचे आहे.
३. कृषी क्षेत्राचा विकास सध्या करण्यासाठी विशिष्ट व्यवस्था निर्माण करत असताना परिस्थितीचा, एकात्मतेचा समतोलाचा तसेच भावी पिढीला हानी होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.
४. कृषीक्षेत्राच्या विकासामुळे शेतकर्याचे उत्पन्न, शेती मालाचे उत्पादन दर्जा व देशाच्या उत्पादकतेमध्ये वाढ होण्याची शाश्वती निर्माण होते.
५. भारतातील कृषी क्षेत्रात अनेक धान्याचे उत्पादन घेतले जाते. त्यापैकी बाजरी, ज्यूट, एरंडी, आंबा, द्राक्षे, केळी उत्पादनात भारताचा पहिला क्रमांक लागतो. तसेच गहू, तांदूळ, फळे, भाजीपाला, चहा, लसून इ. उत्पादनात भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

**संदर्भ सूची:**

१. भारतीय अर्थव्यवस्था - दत्ता सुन्दरम
२. भारतीय अर्थव्यवस्था जी. एम. झामरे
३. कृषी अर्थशास्त्र - विजय कवी मंडन
४. भारतीय अर्थव्यवस्था - मिश्रा आणि पुरी
५. भारतीय अर्थव्यवस्था - रायखेळकर व दमाजी
६. भारतीय अर्थव्यवस्था एन. एल. चव्हाण
७. भारतीय अर्थव्यवस्था - देसाई भालेराव
८. भारतीय अर्थव्यवस्था - प्रभाकर देशमुख
९. राष्ट्रीय फालोत्पादन मंडळ २०२१-२२
१०. भारतीय अर्थव्यवस्था भगीरथ' आय ए एस, पुणे
११. krishna. k.l. kapila. uma (2009) (regarding in indian agriculture and industry)
१२. ecologycal problems due to shifting and cultivation web archieve.org
१३. www.agreetrust.org
१४. www.agreeindia.com
१५. en.m.wikipedia.org
१६. केंद्रीय संखिकीय संघटना (२०१७)